(क्षिप्र-अभिज्ञा प्राप्त करणाऱ्यांमध्ये अग्र)

# बाहिय दारुचीरिय आणि भद्दा कुण्डलकेसा

मराठी



विपश्यना विशोधन विन्यास

(क्षिप्र-अभिज्ञा प्राप्त करणाऱ्यांमध्ये अग्र)

# बाहिय दारुचीरिय

## आणि

# भद्दा कुण्डलकेसा

(मराठी)

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी

**M38 - बाहिय दारुचीरिय आणि भद्दा कुण्डलकेसा**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : डिसेंबर २०१९

**मूल्य: ₹ 30.00**

ISBN 978-81-7414-430-0

**प्रकाशक:**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मागिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा: नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४९९८, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०,
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**

**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
जी-२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

## भगवान बुद्धांची उद्घोषणा

**"एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं**
**खिप्पाभिञ्ञानं यदिदं बाहियो दारुचीरियो ॥"**
**"एतदग्गं, भिक्खवे, मम साविकानं भिक्खुनीनं**
**खिप्पाभिञ्ञानं यदिदं भद्दा कुण्डलकेसा ॥"**

– *अङ्गुत्तरनिकाय (१.१.२१६,२४३*

"भिक्षूंनो, माझ्या भिक्षू-श्रावकांमध्ये – क्षिप्र-अभिज्ञा
प्राप्त करणाऱ्यांमध्ये अग्र आहे बाहिय दारुचीरिय!
"भिक्षूंनो, माझ्या भिक्षुणी-श्राविकांमध्ये – क्षिप्र-अभिज्ञा
प्राप्त करणाऱ्यांमध्ये अग्र आहे भद्दा कुण्डलकेसा!

# बाहिय दारुचीरिय आणि भद्दा कुण्डलकेसा

# बाहिय दारुचीरिय आणि भद्दा कुण्डलकेसा

## विषयानुक्रमणिका


**प्रकाशकीय ........................................................ 7**

**बाहिय दारुचीरिय .................................................. 11**

सुप्पारक पत्तन ........................................................ 11
वर्तमान कथा ........................................................ 11
बाहियचा हितचिंतक ब्रह्मा ........................................ 12
असेच शिकायला पाहिजे ............................................ 13
क्षिप्र-अभिज्ञा प्राप्त बाहिय दारुचीरिय ........................... 15
बाहिय दारुचीरियचे पूर्व दुष्कर्म ................................. 16

**भद्दा कुण्डलकेसा .................................................. 18**

भद्दा-सत्तुकचा जन्म ................................................ 18
यौवनकाळ ............................................................ 18
भद्दा-सत्तुकचा विवाह ............................................. 19
प्रत्युत्पन्नमति (अवधानी) भद्दा .................................. 20
सत्तुकद्वारा भद्दाच्या हत्येचे कटकारस्थान ........................ 21
भद्दाचा गृहत्याग ................................................... 22
जंबू (जांभूळ) परिव्राजिका ........................................ 23
परिव्राजिकेचा स्थविर सारिपुत्तांबरोबर शास्त्रार्थ ................ 24
अतीत कथा .......................................................... 26
    भगवान पदुमुत्तरांचा शासनकाळ ............................ 26
    भगवान कस्सपांचा शासनकाळ ................................ 26
    भगवान गौतम बुद्धांचा शासनकाळ .......................... 26
कुण्डलकेसाचे उद्गार ............................................... 27
परिशिष्ट ............................................................... 29

# प्रकाशकीय

# प्रकाशकीय

भगवान बुद्धांचा उपदेश सगळ्यांसाठी एकसारखाच होता. कोणी पुरुष असो वा स्त्री; कोणत्याही प्रकारचा कोणताच भेदभाव नव्हता. जो या मार्गाने चालेल त्याला तत्काळ फळ देणारा आणि सर्वांना एकसारखेच फळ देणारा आहे.

बुद्धांच्या उपदेशाचे अनुकरण करुन बाहिय दारुचीरिय तसेच भद्दा कुण्डलकेसा यांनी एकसारखेच निर्वाणाचे फळ चाखले. भगवानांनी आपल्या भिक्षू श्रावकात आणि भिक्षुणी श्राविकात आयुष्मान बाहिय दारुचीरिय तसेच भद्दा कुण्डलकेसा यांना क्षिप्र-अभिज्ञा (शीघ्र विशिष्ट ज्ञान) प्राप्त करणाऱ्यात ‘अग्र’ ही उपाधी प्रदान केली.

**********

कोणा एका दुर्घटनेमुळे बाहिय दारुचीरिय नावाचा माणूस सुप्पारक नावाच्या गावात राहू लागला. तो अर्हंत मानला जात होता. तो सुद्धा स्वतःला अर्हंत समजू लागला.

परंतु एके दिवशी कोण्या एका हितचिंतकाने मोठ्या प्रेमाने त्याला समजावले की तो अजून अर्हंत झालेला नाही आणि अर्हंत होण्याच्या मार्गावर आरुढसुद्धा झालेला नाही. त्याने उत्सुकतेने प्रश्न विचारला, “काय, या जगात कोणी अशी व्यक्ती आहे जी अर्हंत झालेली आहे?”

उत्तर मिळाले, “हो, अवश्य आहे. यावेळी भगवान अर्हंत सम्यक-संबुद्ध सावत्थीच्या जेतवनात विहार करीत आहेत.”

त्याने राजनगरी सावत्थीकडे शीघ्रतेने आपली पावले वळवली. तेथे पोहोचल्यावर भगवान सम्यक-संबुद्धांना राजपथावर भिक्षाटनासाठी जात असताना त्याने पाहिले. तेव्हा श्रद्धाविभोर होऊन भगवानासमोर गुडघे टेकविले, त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले.

– “भंते, भगवान मला शुद्ध धर्माची साधना शिकवा; ज्यामुळे माझे अनंत काळापर्यंत कल्याण होईल.”

– “बाहिय धर्म शिकविण्यासाठी ही वेळ योग्य नाही. तथागत आता भिक्षाटनासाठी निघाले आहेत.”

– "भंते भगवान, जीवनाचा काय भरवसा? मग ते जीवन माझे असो वा आपले! भंते भगवान! मला धर्म शिकवा. सुगत, मला (शुद्ध धर्माची) साधना शिकवा; ज्यामुळे अनंत काळापर्यंत माझे कल्याण साधेल."

– बाहिय दारुचीरियने दोनदा-तीनदा कळकळीने आग्रह केल्यानंतर तेथेच रस्त्यावर एका बाजूला थांबून भगवानांनी त्याला धर्मोपदेश दिला. थोडक्यात धर्म साधना शिकविली.

म्हणाले, "अशा प्रकारे अभ्यास कर – **दिट्ठे दिट्ठमतं भविस्सति,** पाहण्यात फक्त पाहणेच असू दे, अशाच प्रकारे ऐकण्यात फक्त ऐकणेच असावे, वास घेण्यात फक्त वास घेणेच, चाखण्यात फक्त चाखणेच, स्पर्शात फक्त स्पर्श जाणणे, जाणण्यात फक्त जाणणेच असावे."

समजदार बाहिय दारुचीरियने भगवानाच्या या सारयुक्त उपदेशाला खूप खोलवर जाणले. बाहिय दारुचीरिय पूर्व-पारमी संपन्न होता. पाहता-पाहता सर्व पूर्वसंचित भव-संस्कारांपासून मुक्त झाला, चित्त अनासक्त झाले आणि आस्रवांपासून विमुक्त झाला. परमपद निर्वाणाचा साक्षात्कार झाला. बाहिय दारुचीरिय कृतकृत्य झाला.

**********

भद्दा राजगृहमध्ये राहणाऱ्या एका श्रेष्ठीच्या घरात जन्मली. जेव्हा ती तारुण्यावस्थेत आली तेव्हा एके दिवशी नगर-रक्षक सत्तुक नावाच्या चोराला राजासमोर घेऊन जात असताना भद्दा सत्तुकवर आसक्त झाली. कसे तरी तिने सत्तुकला नगर-रक्षकांच्या तावडीतून सोडविले आणि त्याच्याबरोबर विवाह केला.

भद्दाचे जीवन सुखपूर्वक जात होते. परंतु थोड्याच दिवसात सत्तुकचा चोरी करण्याचा जुना स्वभाव जागा झाला. सत्तुकने भद्दाची हत्या करुन तिचे दागिने हस्तगत करण्याचा कुटील डाव रचला. यासाठी तो भद्दाला एका पर्वतावर घेऊन गेला. तेथे त्याने भद्दाला आपला हेतू प्रकट करीत सांगितले, "मी तुझी हत्या करुन तुझे सर्व दागिने प्राप्त करु इच्छितो." भयभीत झालेल्या भद्दाने आपल्या कुशल बुद्धिमत्तेने स्वतःच्या प्राणांचे रक्षण केले.

या घटनेनंतर तिने परिव्राजकांना प्रव्रज्येची मागणी केल्यानंतर ती प्रव्रजित झाली आणि **'भद्दा कुण्डलकेसा'** या नावाने प्रसिद्ध झाली. हळूहळू ती धार्मिक वार्तालापात (शास्त्रार्थात) निपुण झाली. एकदा आयुष्मान सारिपुत्तांबरोबर

झालेल्या शास्त्रार्थात तिला पराजय पत्करावा लागला. आयुष्मान सारिपुत्ताने तिला भगवानांच्या शरणात जाऊन धर्मोपदेशासाठी प्रोत्साहित केले. थोड्या दिवसातच भद्दा कुण्डलकेसाने अर्हत्वाची प्राप्ती केली. भगवानांनी कुण्डलकेसाला आपल्या क्षिप्र-अभिज्ञा प्राप्त केलेल्या भिक्षुणींमध्ये अग्र घोषित केले.

**********

भगवान बुद्धांच्या भिक्षू-श्रावकांच्या आणि भिक्षुणी श्राविकांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आम्हा सर्वांना प्रेरणेचे कारण होवो; ज्यामुळे विपश्यी साधक आणि साधिका त्यापासून प्रेरणा प्राप्त करुन आपल्या जीवनशैलीचे पुनरावलोकन करुन थोडीतरी सुधारणा करु शकतील. या मंगल भावनेसह या पुस्तिकेचे प्रकाशन केले जात आहे.

**विपश्यना विशोधन विन्यास**